# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२३

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शनिवार, दिनांक २५ मार्च, २०२३ / चैत्र ४, १९४५ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री**<br>**(२) अन्न व औषध प्रशासन मंत्री**<br>**(३) उद्योग मंत्री**<br>**(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री**<br>**(५) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३८**

---

### जुन्या बीड बायपास (जि. छत्रपती संभाजीनगर) रोडवरील संग्रामनगर उड्डाणपुलाच्या सदोष कामाबाबत

**(१) * १७७८४ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्या बीड बायपास (जि. छत्रपती संभाजीनगर) येथील रोडवरील संग्रामनगर उड्डाणपुलाखाली सुरु असलेल्या खोदकामामुळे पुलाचे काम चुकीचे झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्वामी हंसराज तीर्थ चौकात होत असलेल्या बायपासच्या नव्या पुलाखालून अस्तित्वात असलेल्या जुन्या रस्त्याची उंची पुलाच्या बीमपर्यंत ५.५ मीटर असणे आवश्यक असतानाही सदरहू रस्त्याची उंची ३.८ मीटर ठेवण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पुलाचे सदोष डिझाईन लपविण्यासाठी कंत्राटदार व अधिकारी/कर्मचारी यांनी भुयारी मार्गासाठी पुलाखाली आणि पुलाच्या दोन्ही बाजूंनी खोदकाम सुरु केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे, तद्नुषंगाने चुकीचे डिझाईन तयार करणाऱ्या संबंधितांवर व त्यास मदत करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.

तथापि, याबाबत प्रसारमाध्यमांमध्ये बातमी आलेली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

सदरचे काम मंजूर आराखड्यानुसार पूर्ण केल्यानंतर वाहतूकीकरिता ५.५० मीटर व्हर्टीकल क्लीअरन्स उपलब्ध होणार आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ग्रंथापालांची रिक्त पदे भरून अतिरिक्त ठरलेल्या पूर्णवेळ ग्रंथपालांचे समायोजन करण्याबाबत

**(२) * १७५५५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक, श्री.कपिल पाटील, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रवीण दटके, श्री.रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.महादेव जानकर, श्री.सत्यजीत तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक १५४२६ ला दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील विद्यार्थी- विद्यार्थींनीमध्ये वाचन संस्कृती व आवड रूजविण्याचे कामामध्ये शालेय ग्रंथपाल या पदाची महत्वाची भूमिका असून शाळा तिथे ग्रंथालय या तत्त्वाचा अवलंब करून प्रत्येक शाळेत ग्रंथपालाची गरज असताना गेल्या अनेक वर्षापासून सदर पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थी संख्येची अट शिथिल करून ग्रंथपालांना वरिष्ठ महाविद्यालयातील नियमानुसार उच्च प्राथमिक व माध्यमिक मिळून किमान ५०० विद्यार्थी संख्या असलेल्या सरसकट सर्व शाळांमधील ग्रंथपाल यांना पूर्णवेळ शिक्षक (ग्रंथपाल) असा दर्जा देऊन आवश्यक असल्यास अन्य विषयाचा वर्कलोड देऊन नियमित वेतनश्रेणी लागू करण्याची मागणी शिक्षक भारती संघटना आणि महाराष्ट्र राज्य ग्रंथपाल महासंघाने केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अतिरिक्त ठरलेल्या पूर्णवेळ ग्रंथपालाचे समायोजन करण्याबाबत तसेच अर्धवेळ ग्रंथपालाचे पूर्णवेळ पदी उन्नयन करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने ग्रंथपालांची रिक्त पदे भरण्याबाबत तसेच अतिरिक्त ठरलेल्या पूर्णवेळ ग्रंथपालाचे समायोजन करण्याबाबत व अर्धवेळ ग्रंथपालाचे पूर्णवेळ पदी उन्नयन करणेबाबतच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) राज्यातील अतिरिक्त ठरलेल्या पूर्णवेळ ग्रंथपालांचे समायोजन तसेच अर्धवेळ ग्रंथपालांचे पूर्णवेळ ग्रंथपालपदी नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला होता. वित्त विभागाने त्यावर काही मुद्दे उपस्थित केले होते. त्याअनुषंगाने प्रस्ताव पुनश्च वित्त विभागास सादर करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## अलिबाग – रोहा दरम्यानच्या रस्त्याच्या कामामध्ये कंत्राटदार कंपनीने गैरव्यवहार केल्याबाबत

**(३) * १६९९३ श्री.जयंत पाटील, श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अलिबाग - रोहा रस्त्याचे काम मेसर्स जेआरए रस्ता प्रकल्प प्रा. लि. या कंत्राटदार कंपनीला देण्यात आले असून सदर कंत्राटदाराने रस्त्यावरील नांगरवाडी जवळ डांबर बॅच मिक्स प्लांट व रेडिमिक्स सिमेंट काँक्रीट प्लांट उभारल्याचे दाखवून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आगाऊ रक्कम म्हणून रुपये १८ कोटी एवढी घेतली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटदाराने रुपये १७७ कोटींच्या कामाची आगाऊ रक्कम म्हणून रुपये १८ कोटी एवढी रक्कम घेऊन एक वर्ष होऊनही अद्याप अलिबाग- रोहा हॅम (हायब्रीड न्युटी मॉडल) अंतर्गत या राज्यमार्गाचे काम सुरू केलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मेसर्स जेआरए रस्ता प्रकल्प प्रा. लि. या कंत्राटदार कंपनीला सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आगाऊ रक्कम म्हणून रुपये १८ कोटी एवढी रक्कम कोणत्या निकषाच्या आधारे देण्यात आली तसेच शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करार संपुष्टात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने करार संपुष्टात येऊनही काम न करणाऱ्या संबंधित दोषी मेसर्स जेआरए रस्ता प्रकल्प प्रा. लि. या कंत्राटदार कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) सदर प्रकल्पाच्या करारनाम्यातील तरतूदीनुसार कंत्राटदारास रक्कम रुपये १३.१४ कोटी इतका मोबीलायझेशन ॲडव्हान्स देण्यात आला आहे. संबंधित कंत्राटदाराने सुडकोली गावाजवळ बॅच मिक्स प्लांट व रेडिमिक्स काँक्रीट प्लांट उभारले आहेत.

(२) सदर कामास अद्याप सुरुवात झालेली नाही, हे खरे आहे.

(३) सदर प्रकल्पाच्या करारनाम्यातील तरतूदीप्रमाणे संबंधित कंत्राटदारास रुपये १३.१४ कोटी इतका मोबीलायझेशन ॲडव्हान्स देण्यात आला आहे.

(४) करारनाम्यातील तरतूदीनुसार दिनांक २२/०७/२०२२ पासून संबंधित कंत्राटदारावर प्रतिदिन रुपये ८९,०००/- इतकी नुकसान भरपाई आकारण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना अन्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे किरकोळ रजा व अन्य सुविधा देण्याबाबत

**(४) * १७२७१ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना अन्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे किमान १५ किरकोळ रजा, अर्जित रजा व अन्य सुविधा समान न्यायाने देण्याबाबतची मागणी शिक्षक भारती संघटनेने केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन आणि महाराष्ट्र दिन या सार्वजनिक सुट्टया असल्यातरी शिक्षकांना त्यादिवशी शालेय व राष्ट्रीय कार्यक्रम व कर्तव्यामुळे सुट्या घेता येत नाहीत त्यांना त्याबदल्यात भरपाई रजा मंजूर करण्याबाबत शासनाची काय भूमिका आहे,
(३) असल्यास, अर्जित रजा रोखीकरण करण्याबाबत सर्व राज्य सरकारी, निमसरकारी व अनुदानित शिक्षक यांना समान न्यायाने लागू असूनही शिल्लक रजांचे रजा रोखीकरण शिक्षणाधिकारी देत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तद्नुषंगाने शिक्षकांना रजा रोखीकरण देत नसलेल्या संबंधित दोषी शिक्षणाधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.
(२) राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन आणि महाराष्ट्र दिन या सार्वजनिक सुट्या घेता येत नाही, हे जरी खरे असले तरी सर्व शासकीय कार्यालयांत हे राष्ट्रीय सण साजरे करणे ही प्रत्येक कार्यालयाची जबाबदारी आहे. त्यासाठी शिक्षकांची पूर्ण दिवस उपस्थिती नसते. त्यामुळे भरपाई रजा मंजूर करण्याची आवश्यकता नाही.
(३), (४) व (५) शिक्षक संवर्गास दीर्घ सुट्टीचा लाभ मिळत असल्याने त्यांना अर्जित रजा रोखीकरण अनुज्ञेय नाही. त्याअनुषंगाने शिक्षकांना रजा रोखीकरण देत नसलेल्या संबंधित शिक्षणाधिकारी यांच्यावर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबत

**(५) * १७१३२ श्री.किरण सरनाईक, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुरेश धस, श्री.किशोर दराडे, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शिक्षकेतर कर्मचारी यांना राज्य कर्मचाऱ्यांप्रमाणे २४ वर्षांची दुसरी कालबध्द पदोन्नतीच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देऊन ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे १०,२०,३० योजना तात्काळ लागू करण्याबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व राज्य सरकारी, निमसरकारी कर्मचाऱ्यांना/ खाजगी शाळेतील अनुदानित शिक्षकांनाही आश्वासित प्रगती (१०,२०, ३०) योजना लागू असताना जिल्हा परिषद आणि अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना ही योजना लागू करण्यात आलेली नाही, तसेच अर्धवेळ म्हणून

नियुक्त असलेले पूर्ण वेळ पदाएवढे काम करीत असल्याने त्यांना ही १२ वर्षानंतर पूर्ण वेळ शिक्षकांप्रमाणे वरिष्ठ वेतनश्रेणी मिळण्याची मागणी केली जात असून अर्धवेळ म्हणून नियुक्ती केलेल्या शिक्षकांना वरिष्ठ वेतन श्रेणीचा लाभ दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अमरावती विभागातील अंशत: अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ शासन निर्णय क्र.१०८९ दिनांक १५ जानेवारी, १९९० नुसार अनुदान टक्केवारीची अट न धरता लाभ मिळणेबाबत कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, आश्वासित प्रगती (१०,२०, ३०) योजनेचा लाभ मिळण्याबाबत शिक्षकेतर संघटना व शिक्षक लोकप्रतिनिधी यांच्याकडून शासनाकडे वारंवार मागणी करण्यात येत असून सदर योजना संबंधितांना लागू करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी सभागृहात आश्वासित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने खाजगी अनुदानित माध्यमिक शिक्षकेतर कर्मचारी/जिल्हा परिषद आणि अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना तसेच अर्धवेळ शिक्षकांना १२ वर्षानंतर पूर्ण वेळ वेतनश्रेणी मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे नाही, खाजगी व्यवस्थापनेच्या शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाने काढलेल्या त्रुटींची पूर्तता करुन फेरसादर करण्यात येत आहे.

(२) हे अंशत: खरे आहे. तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना खाजगी व्यवस्थापनेच्या शाळेतील शिक्षक कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात येत आहे. तसेच अर्धवेळ म्हणून नियुक्त असलेल्या शिक्षकांना वरिष्ठ वा निवड श्रेणी अनुज्ञेय नाही.

(३) हे खरे नाही.

(४) हे खरे नाही.

(५) खाजगी व्यवस्थापनेच्या शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाने काढलेल्या त्रुटींची पूर्तता करुन फेरसादर करण्यात येत आहे. अर्धवेळ म्हणून नियुक्त असलेल्या शिक्षकांना वरिष्ठ वा निवड श्रेणी अनुज्ञेय नसल्यामुळे प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मिलेनियम बिझनेस पार्क, महापे (नवी मुंबई) येथील भूखंड विनानिविदा विकासक कंपनीस देण्यात आल्याबाबत

**(६) * १७४४२ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : तारांकित प्रश्न क्रमांक १६७८३ ला दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिलेनियम बिझनेस पार्क, महापे, नवी मुंबई येथील भूखंड क्र.जनरल-३१ मोजमाप ८३७९ हा भूखंड पार्किंगसाठी राखीव असतानासुद्धा कोणतीही निविदा न मागविता महामंडळाचे संबंधित अधिकारी यांनी संगनमत करून आयटी/आयटीएस या प्रयोजनाकरिता सवलतीच्या दरात रूपा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या विकासक कंपनीस भूखंड देऊन शासनाचे आर्थिक नुकसान केल्याची घटना ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अभियांत्रिकी विभागाच्या अहवालानुसार सदर भूखंड उद्योग विस्तारांतर्गत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नियमानुसार शुल्क आकारुन वाटप करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकरणी भूखंडाचे वाटप रद्द करून संबंधितांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याची मागणी श्री.नारायण धर्मा डाऊरकर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी), अंधेरी, मुंबई यांच्याकडे दिनांक १३ ऑक्टोबर,२०२२ रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कारवाईचे आदेश दिले असूनही अद्यापपर्यंत बांधकामावर कोणतीच कारवाई झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुषंगाने उद्योग विस्ताराच्या नावाखाली कोणतीही निविदा न मागविता रुपा इन्फ्रस्टक्चर प्रा. लि. या विकासक कंपनीस, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस बजावून संबंधित दोषी अधिकारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) हे खरे नाही.

मिलेनियम बिझनेस पार्क, मौजे महापे, नवी मुंबई येथील भूखंड क्र. जनरल-३१, क्षेत्र ८३०७ चौ.मी. दिनांक ११/०७/१९६७ रोजी श्री.नारायणदास भुलचंददास व इतर यांना वाटप करण्यात आला होता. परंतु भूखंडधारकाने विहित कालावधीत भूखंडाचा विकास न केल्याने सदरचा भूखंड पंचनामा करुन मऔवि महामंडळाने दिनांक २६/०४/२००० रोजी परत ताब्यात घेतला आहे.

त्यानंतर सदर भूखंड बिल्डींग पार्कींगसाठी राखीव ठेवण्यात आला होता. त्याकरिता निविदा प्रसिध्द करणेत आली होती. परंतु, त्यास प्रतिसाद न मिळाल्याने सदर भूखंड इतर प्रयोजनासाठी अनआरक्षित ठेवण्याबाबतचा निर्णय मऔवि महामंडळामार्फत घेण्यात आला.

मे. रुपा इन्फोटेक आणि इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांनी उद्योग विस्तारांतर्गत सदर भूखंडाचे वाटप करणेबाबत केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने दिनांक ३१/०७/२०१९ च्या भूखंडवाटप समितीच्या बैठकीमध्ये सदर भूखंड मे. रुपा इन्फोटेक आणि इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. या कंपनीस उद्योग विस्तारांतर्गत वाटप करण्यात आले आहे.

भूखंड वाटप समितीने सदर भूखंडाचे वाटप करताना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकरिता १०० वाहनांसाठी पार्कींगकरिता जागा राखीव ठेवण्याचे भूखंडधारकास बंधनकारक केले आहे.

सदरच्या भूखंडाचे वाटप महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या धोरणानुसार नियमोचित शुल्क वसूल करुन करण्यात आलेले आहे. त्यामुळे आर्थिक नुकसान झालेले नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) मे. रुपा इन्फोटेक आणि इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महांडळाच्या अभियांत्रिकी विभागास दिनांक ०४/०१/२०२३ रोजी माहिती तंत्रज्ञान उद्यान इमारतीचे नकाशे मंजुरीसाठी सादर केलेले आहेत. सदर नकाशास अद्याप मंजुरी देणेत आलेली नाही. सद्य:स्थितीत भुखंड क्र. जनरल-३१ संपूर्ण रिकामा आहे. त्यावर कोणतेही बांधकाम नाही.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील जिल्हा परिषद शाळांमधील कला, क्रीडा व कार्यानुभव शिक्षकांची नियुक्ती पुर्ववत करण्याबाबत

**(७) * १७३०८ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर, श्री.किरण सरनाईक, श्री.किशोर दराडे, श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थेच्या जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका या शाळांमध्ये इयत्ता ६ वी ते ८ वी मधील विद्यार्थी संख्या १०० असल्यास कला व क्रीडा, कार्यानुभव विषय अध्यापनाची तरतूद आहे, त्यानुसार २०१२ व २०१६ पासून कला, क्रीडा व कार्यानुभव विषय अध्यापनासाठी अंशकालीन अतिथी निदेशकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद, नगरपरिषद व महानगरपालिका शाळेवर सन २०१२-२०१३ पासून काम करणाऱ्या कला, क्रीडा व कार्यानुभव अंशकालीन अतिथी निदेशक यांची नियुक्ती सन २०१९-२०२० पासून थांबविण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कला, क्रीडा व कार्यानुभव अंशकालीन अतिथी शिक्षकांच्याबाबत मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने WP/७१०६/२०१३ प्रकरणात दिनांक ९ मे २०१४ रोजी कला, क्रीडा व कार्यानुभव विषयाचा कायम संवर्ग तयार करावा व कार्यरत शिक्षकांना सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबतचे निर्देश दिले असून त्यानंतरच्या अवमान याचिकांवरही मा.उच्च न्यायालयाने आपले आदेश कायम ठेवले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिक्षक भरती पवित्र प्रणालीमार्फत करण्यात आली आहे सदर भरतीमध्ये कला, क्रीडा व कार्यानुभव शिक्षक यांची भरती करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, नगरपरिषद व महानगरपालिका शाळेत काम करणाऱ्या कला, क्रीडा व कार्यानुभव अंशकालीन अतिथी निदेशक यांची थांबविलेली नियुक्ती पुर्ववत करणे, वर्कलोड असलेल्या शाळांमध्ये पूर्णवेळ नियुक्ती तर अर्धवेळ किंवा पुरेसा वर्कलोड नसलेल्या शाळांचा क्लस्टर करून तेथे पूर्णवेळ शिक्षक देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) व (६) सदर विषय न्यायप्रविष्ट आहे.

-----------------

## विना आणि अंशत: अनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना प्रचलित नियमानुसार अनुदान देणेबाबत

**(८) * १७७०६ श्री.राजेश राठोड, श्री.किशोर दराडे, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक १५५२१ ला दिनांक ३० डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खाजगी व्यवस्थापनच्या विनाअनुदानित शाळांना शासनाने २० टक्के अनुदान सन २०१६ मध्ये सुरू केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खासगी, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व वर्ग तुकड्यांतील ६५ हजार विना आणि अंशत: अनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जून, २०१४ व नोव्हेंबर, २०१५ मधील १०० टक्के वेतन अनुदान लागू करण्याच्या प्रमुख मागणीसाठी शिक्षक समन्वय संघाने दिनांक १२ ऑक्टोबर, २०२२ पासून मुंबईतील आझाद मैदानावर बेमुदत महाआक्रोश आंदोलन सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर शाळांना सन २०१६ नंतर टप्पा वाढणे अपेक्षित असताना तो टप्पा सन २०१७ मध्ये न वाढता सन २०१९ मध्ये २० टक्के वाढीव देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर खासगी, प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व वर्ग तुकड्यांतील ६५ हजार विना आणि अंशत: अनुदानित शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जून, २०१४ व नोव्हेंबर, २०१५ मधील १०० टक्के अनुदान देण्याबाबत तसेच वाढीव अनुदान मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) अनुदान पात्रतेच्या निकषांनुसार पात्र होत असलेल्या काही खाजगी विनाअनुदानित शाळांना २० टक्के अनुदान प्रदान करण्यात आले आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक १३/१२/२०२२ रोजीच्या बैठकीत त्रुटी पुर्तता केलेल्या अनुदानासाठी पात्र शाळांना २० टक्के व ४० टक्के तसेच, पात्र अघोषित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा वर्ग/ तुकड्यांना सरसकट २० टक्के अनुदान देण्याचा तसेच, यापूर्वी २० टक्के व ४० टक्के अनुदान घेत असलेल्या शाळांना पुढील २० टक्के अनुदानाचा वाढीव टप्पा अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार शासन निर्णय, दिनांक ०६/०२/२०२३ रोजी निर्गमित केला आहे. तसेच हिवाळी अधिवेशन २०२२ मध्ये रुपये २७५ कोटींची पुरवणी मागणी मंजूर केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कामकाजामध्ये अनियमितता होत असल्याबाबत

**(९) * १७१४३ श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, श्री.प्रविण दरेकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे : तारांकित प्रश्न क्रमांक १३६६९ ला दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठाच्या परीक्षांचे निकाल उशिरा लावणे तसेच अन्य अनियमित कामाबद्दल एम.के.सी.एल. या कंपनीची चौकशी होण्याबाबत मा.उच्च शिक्षण मंत्री यांनी सभागृहात आदेशित केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशी सुरू असतानादेखील विद्यापीठाची अन्य कामे एम.के.सी.एल. कंपनीस देण्यात येत असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर दोषी कंपनीस वारंवार विविध कामे दिल्याबाबत लोकप्रतिनिधींनी लेखी तक्रार निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तदनुषंगाने चौकशी समितीचा अहवाल सभागृहासमोर ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) नाही, हे खरे नाही.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विद्यापीठाच्या परीक्षांचे निकाल उशिरा लावणे तसेच अन्य अनियमित कामाकाजाबाबत चौकशी करण्यासाठी शासनस्तरावरुन चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने दिलेल्या अहवालातील शिफारशी विचारात घेऊन कुलगुरु, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांना संबंधितावर कारवाई करण्याचे तसेच सदर प्रकरणी खुलासा सादर करण्याचे कळविण्यात आले होते. कुलगुरु, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांनी सादर केलेल्या खुलाशाच्या अनुषंगाने कुलपती म्हणून आवश्यक ती कारवाई करण्यासाठी मा.राज्यपाल महोदयांकडे प्रकरण सादर केलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यातील रस्त्यांची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(१०) * १७०७२ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) त्र्यंबकेश्वर, पहिने-देवगाव, वावीहर्ष, वैतरणा, घोटी (जि.नाशिक) येथील माहे एप्रिल, २०२२ मध्ये दुरुस्ती करण्यात आलेल्या रस्त्यांचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाल्याने चार महिन्यातच रस्त्यांवर मोठे खड्डे पडून रस्त्यांची दूरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निकृष्ट दर्जाच्या रस्त्यांची तात्काळ दुरुस्ती करणेबाबत ग्रामस्थांनी दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्यांचे निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या कंत्राटदार व रस्त्याच्या कामातील दर्जाबाबत जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी श्रमजीवी संघटनेने दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजी नाशिक येथील देवगाव फाट्यावर रास्तो रोको आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे नाही.
(२) ग्रामस्थांचे निवेदन प्राप्त आहे.
(३) श्रमजीवी संघटनेने दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजी देवगाव फाट्यावर रास्ता रोको आंदोलन केले होते हे खरे आहे.
(४) त्र्यंबक देवगाव घोटी या रस्त्यावर ६ कि.मी. लांबीत रस्त्याच्या रूंदीकरणाचे व डांबरीकरणाचे काम नोव्हेंबर, २०२२ मध्ये पूर्ण करण्यात आले असून सद्य:स्थितीत रस्ता वाहतूकीसाठी सुस्थितीत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुर्तिजापूर (जि.अकोला) येथे स्वस्त धान्य दुकानातील तांदळाची खुल्या बाजारात विक्री होत असल्याबाबत

**(११) * १७३७० श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुर्तिजापूर (जि.अकोला) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामधील खाजगी गोदामामध्ये शासकीय धान्य वितरण प्रणालीतील तांदूळ साठवणूक करुन शिधापत्रिकाधारकांना वितरित केला जातो, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शिधापत्रिकाधारकांसाठी असलेल्या तांदळाचा काळाबाजार करुन खुल्या बाजारात विक्री केली जात असल्याच्या प्राप्त तक्रारीवरून पोलिसांनी २९६.४० क्विंटल तांदूळ, खाली बारदाने, शासकीय धान्य वितरण प्रणालीचे लेबल वाहनासह सुमारे रुपये २६ लाख किंमतीचा मुद्देमाल जप्त करुन आरोपीविरुध्द इसी ॲक्ट कलम ७ (३) अन्वये मुर्तिजापूर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केला असल्याचे दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पोलीस तपासात काय आढळून आले, तसेच शिधापत्रिकाधारकांसाठी असलेल्या तांदळाचा काळाबाजार करुन खुल्या बाजारात विक्री करणाऱ्या आरोपींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) नाही.

(२) व (३) पोलीस स्टेशन, मुर्तिजापूर यांनी दिलेल्या पत्रानुसार घटनास्थळी पंचनामा करण्यात आला असता, पोलिसांकडून जप्त करण्यात आलेल्या वाहनामध्ये अंदाजे २९६.४० क्विंटल तांदूळ प्लास्टीक बारदान्यामध्ये आढळून आले. मात्र, सदर बारदान्यावर शासकीय धान्य वितरण प्रणालीचे लेबल आढळून आलेले नाही. सदर तांदूळ शासकीय धान्य गोदाम, मुर्तिजापूर येथे जमा करण्यात आला आहे.

याप्रकरणी घटनास्थळी उपस्थित असलेले बारदाना व्यावसायिक आसीफ खान हाफीज खान, गोपाल अशोक अग्रवाल व अंकुश कमलकिशोर अग्रवाल सर्व रा.मुर्तिजापूर यांच्याविरुध्द जीवनावश्यक वस्तु अधिनियम, १९५५ (EC Act, १९५५) च्या कलम ३ व ७ नुसार पोलीस स्टेशन, मुर्तिजापूर शहर येथे अप क्र.०२/२०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयातील कंत्राटी अध्यापकांना न्याय देण्याबाबत

**(१२)** * **१७४९० श्री.रामदास आंबटकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बहुतांश अभियांत्रिकी महाविद्यालयात कायमस्वरुपी अध्यापकांची संख्या ५० टक्केपेक्षा कमी असल्याने तासिका तत्वावरील अतिथी अध्यापकांना त्यांच्या ठराविक नमुद केलेल्या कामाव्यतिरिक्त अन्य कामेदेखील करावी लागत असून सदर कामाचा मोबदला अध्यापकांना मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अध्यापकांच्या वेतनासाठी महिनाकाठी वेतन अनुदान येत नसल्याने अध्यापकांचे वेतन हे महिन्याला दिलेल्या देयकावरुन काढले जात असल्याने इतर देयकाप्रमाणे हे देयक खाते छाननी होऊन मंजूर होत असल्याने, निधी उपलब्ध असेल तेव्हाच देयक मंजूर होत असल्याने अध्यापकांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वर्षभरात सदर अतिथी अध्यापकांचे उत्पन्न हे अंदाजे रुपये १ लाख २० हजार एवढेच होत असूनही अध्यापकांना या उत्पन्नाकरिता आठवड्यातील पाच दिवस रोज २ तास असे दरवर्षी ७ महिने काम करावे लागते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर तासिका तत्वावरील अध्यापकांची अथवा कंत्राटी तत्वावरील अध्यापकांच्या हिताच्यादृष्टीने शासनाची भूमिका काय आहे व त्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) नाही,

तासिका तत्वावरील अतिथी अध्यापकांना त्यांच्या शैक्षणीक कामाव्यतिरिक्त परिक्षेशी संबंधित कामे सोपविल्यास नियमानुसार त्यांना मानधन देण्यात येते.

(२) अंशत: खरे आहे.

अध्यापक अधिव्याख्यात्यांच्या, मानधनाचा खर्च भागविण्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद मागणीपेक्षा कमी उपलब्ध झाल्याने वेतनास विलंब झालेला आहे. तथापि, पुरवणी मागणीव्दारे वेतनास पुरेसा निधी उपलब्ध करण्यात आलेला आहे.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी निवृत्तीवेतन योजना पूर्ववत लागू करण्याबाबत

**(१३) * १७४११ श्री.गोपिचंद पडळकर, श्री.किशोर दराडे, श्री.जयंत आसगावकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रवीण दटके, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्यावतीने शिक्षण क्षेत्रातील प्रमुख प्रलंबित मागण्यांकरिता दिनांक २१ व २२ डिसेंबर, २०२२ रोजी धरणे आंदोलन व दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजी विधान भवन, नागपूर येथे मोर्चा आयोजित करुन मागण्या मंजूर करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने व नागपूर येथील लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.शालेय शिक्षण मंत्री व सचिव, शालेय शिक्षण विभाग यांचेकडे निवेदनाद्वारे केली असून, तसेच राज्यातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी व विविध संघटनांनी सेवाग्राम ते नागपूर पायी “पेन्शन संकल्प यात्रा” काढून इतर राज्यांप्रमाणे राज्यात जुनी पेन्शन योजना विनाअट लागू करण्याच्या मागणीसह अन्य मागण्यांकरिता दिनांक २७ डिसेंबर, २०२२ रोजी ‘पेन्शन संकल्प यात्रा’ नागपूर विधिमंडळ अधिवेशनावर आयोजित करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर नियुक्त कर्मचाऱ्यांना परिभाषित अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू केली मात्र महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सदरहू योजना लागू नसल्याचे माहे डिसेंबर, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनात दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी किंवा दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर नियुक्त झालेल्या शिक्षक/कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, विनाअनुदानित/अंशतः अनुदानित/त्रुटी पूर्तता केलेल्या शाळा व नैसर्गिक वाढीच्या तुकड्यांना अनुदान देण्यासाठी मा.मंत्रिमंडळाने मंजूर केलेले रुपये ११६० कोटी व वाढीव रुपये ९४ कोटींचा निधी मंजूर करुन शासन निर्णय निर्गमित करावा, शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १०-२०-३० ची आश्वासित प्रगती योजना लागू करणे, शंभर टक्के अनुदान प्राप्त उच्च माध्यमिक शाळांतील वाढीव पदांना शासन मान्यता प्रदान करणे, शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरणे या मागण्यांसह एकूण १३ मागण्या शासनाकडे केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नव्याने २० टक्के अनुदान तसेच ४० टक्के अनुदान घेणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतरच्या असून २० टक्के अनुदान घेत असलेल्या कर्मचाऱ्यांचे कोणतेही खाते नसल्यामुळे त्यांचे नवीन अंशदान पेन्शन योजनेचे खाते काढण्याबाबत शासनाकडे मागणी केली असून

मागील १६ वर्षात निवृत्त तसेच मृत झालेल्या कर्मचारी व त्यांचे कुटुंबियांस पेन्शन योजनेचा लाभ मिळत नसल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यात सन २००५ नंतर सेवेत आलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांची निवृत्तीवेतन योजना स्थगित करण्यात आल्यानंतरही राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन योजना तसेच भविष्य निर्वाह निधी योजना सुरु असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले असून महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम १९७७/७८ व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ च्या नियम १९ अन्वये निवृत्तीवेतन योजना व नियम २० (२) अन्वये भविष्य निर्वाह निधी योजना लागू असल्याने सदरहू योजना स्थगित न करता नियमित करावी व त्याचा लाभ राज्यातील लाखो शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियमितपणे सुरु ठेवण्याची मागणी शिक्षक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे काय आहे,

(६) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना विनाअट लागू करण्यासह इतर मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, अशा प्रकारची निवेदने प्राप्त झाली आहेत.

(२) महानगरपालिकेमध्ये कार्यरत अधिकारी/कर्मचारी तसेच, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना नगरविकास विभागाच्या दिनांक २२ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार लागू करण्यात आलेली आहे.

(३) अशा प्रकारची निवेदने प्राप्त होत आहेत.

(४) नव्याने २०% व ४०% अनुदानावर आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू नाही. सदर पदांना १००% अनुदान मंजूर झाल्यानंतर राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू होते.

(५) अशा प्रकारची निवेदने लोकप्रतिनिधींकडून प्राप्त होत आहेत.

(६) शासनाचे धोरण सर्व प्रशासकीय विभागांच्या अधिपत्याखालील कर्मचाऱ्यांना समान स्वरुपात लागू होत असल्याने जुनी पेन्शन योजनेबाबत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाकडून याबाबत वेगळे धोरण अवलंबिणे योग्य होणार नाही. तसेच अनुदानासंदर्भाने दिनांक ०६/०२/२०२२ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तसेच इतर मागण्यांबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील नॅक मुल्यांकन न करणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाई करण्याबाबत

**(१४) * १७०३२ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.अरुण लाड, श्री.अनिकेत तटकरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय मुल्यांकन आणि प्रत्ययन परिषदेकडून (नॅक) ‘अ’ श्रेणीसह ३६५ एवढे सर्वाधिक गुणांकन मिळविणाऱ्या मुंबई विद्यापिठांतर्गत ८३९ महाविद्यालयांपैकी केवळ ३३१ महाविद्यालयांनी नॅक मुल्यांकन प्रक्रिया पूर्ण केली असून तब्बल ५०३ महाविद्यालयांनी अद्यापही नॅक मुल्यांकन प्रक्रिया पार पाडली नसल्याची बाब दिनांक १ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उच्च शिक्षण विभागाकडे नोंद असलेल्या राज्यातील ३ हजार ३४६ वरिष्ठ महाविद्यालयांपैकी सुमारे १ हजार ९८६ महाविद्यालयांकडे नॅकचा दर्जा नसल्याचे व त्यामध्ये विनाअनुदानित महाविद्यालयांपैकी १ हजार ९०३ महाविद्यालयांनी त्याकडे दुर्लक्ष केले असून त्यामध्ये पुणे व पनवेल विभागातील सर्वाधिक महाविद्यालये असल्याचे माहे जानेवारी, २०२३ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई विद्यापीठांतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांना नॅक मुल्यांकन करून घेण्याबाबत उच्च शिक्षण संचालनालयाने आजमितीस अनेक वेळा कळवूनही संबंधित महाविद्यालयांनी अद्यापही नॅक मुल्यांकन प्रक्रिया पार पाडलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महाविद्यालयांनी पुनर्मुल्यांकन प्रक्रिया पूर्ण करुन नॅकचा अपेक्षित दर्जा प्राप्त करून घेणे बंधनकारक आहे अन्यथा विद्यापीठाची संलग्नता न मिळणे, विद्यापीठ अनुदान आयोगाचे अनुदान न मिळणे, विद्याशाखा अभ्यासक्रम तुकड्या, विषयांना मंजुरी न मिळणे अशा प्रकारची कारवाई प्रस्तावित असूनही प्रशासनाने या बाबीकडे दुर्लक्ष केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नॅक मुल्यांकन न करणाऱ्या महाविद्यालयांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) हे अंशतः खरे आहे.

संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून प्राप्त महितीनुसार राज्यातील ३३४६ वरिष्ठ महाविद्यालयांपैकी सुमारे १९७३ महाविद्यालयांकडे नॅकचा दर्जा प्राप्त नसून अशा महाविद्यालयांपैकी १८९६ महाविद्यालये कायम विनाअनुदानित महाविद्यालय आहेत. मुंबई व पनवेल विभागातील एकूण ६६८ महाविद्यालयांपैकी २७३ महाविद्यालयांनी नॅक प्राप्त केले आहे तर ३९५ महाविद्यालांची नॅक प्राप्त करून घेण्याची प्रक्रिया सुरू आहे.

नॅक दर्जा प्राप्त नसलेल्या महाविद्यालयांनी पुढील सायकलनुसार नॅक दर्जा प्राप्त करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.
(४) व (५) हे खरे नाही.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूदींनुसार महाविद्यालयांनी नॅक मूल्यांकन व पुनर्मुल्यांकन करणे अनिवार्य असून सर्व अकृषी विद्यापीठे, महाविद्यालये यांना वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. नॅक मूल्यांकनाशिवाय महाविद्यालयांना अनुदान, संलग्नता मंजूर करण्यात येऊ नये अशा तरतुदी आहेत. सदर तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येते.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिक्षण सेवकांना नियमित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत

**(१५) * १७३८१ श्री.किशोर दराडे : तारांकित प्रश्न क्रमांक १५९३५ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नवनियुक्त शिक्षकांना प्रथम ३ वर्षाच्या कालावधीत शिक्षण सेवकाचे मानधन दिले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डीएड स्केल शिक्षकांना ६००० मानधन व बीएड स्केल शिक्षकांना ९००० इतके मानधन दिले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षण सेवकांना नियमित वेतनश्रेणीत वेतन मिळणेबाबत मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कृषीसेवक व ग्रामसेवकांच्या धर्तीवर शिक्षण सेवकांना नियमित वेतनश्रेणी लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) शासन निर्णय दिनांक १७/०९/२०११ अन्वये प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षण सेवकांना प्रथम तीन वर्षाकरिता अनुक्रमे रुपये ६,०००/-, रुपये ८,०००/- व रुपये ९०००/- मानधन दिले जात होते. आता प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षण सेवकांना अनुक्रमे रुपये १६,०००/-, रुपये १८,०००/- व रुपये २०,०००/- मानधन देण्याबाबतची सुधारित तरतूद दिनांक ०७/०२/२०२३ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आलेली आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४) शिक्षणाचा विस्तार, शिक्षणाची गुणात्मक वाढ, शिक्षणासाठी सुरू केलेल्या विविध योजना यांमुळे शिक्षणावरील खर्चामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होत होती. यासाठी वाढीव आर्थिक तरतूद उपलब्ध करणे दिवसेंदिवस कठीण होते. शिक्षकांची रिक्त होणारी पदे वेळेवर भरता यावीत, याकरिता सहाय्यक होणारी पर्यायी योजना म्हणून शिक्षण सेवक योजना सुरु करण्यात आली आहे.

सध्या कृषी सेवकांना प्रथम तीन वर्ष निश्चित वेतन रुपये ६०००/- दिले जाते. तद्नंतर कृषी सहाय्यक म्हणून नियमित पदावर नियुक्त केले जाते.

तसेच ग्रामसेवकांची पदे कंत्राटी तत्वावर पहिल्या तीन वर्षाकरिता रुपये ६०००/- एवढ्या मानधनावर भरण्यात येत असून, तीन वर्षाच्या सेवेनंतर त्यांना नियमित वेतनश्रेणीत समावून घेतले जाते

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे येथील कुलगुरू निवडीकरिता स्थापन झालेल्या शोध समितीबाबत

**(१६) * १७०४९ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे येथील कुलगुरू निवडीकरीता कुलगुरू शोध समितीमध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने नामनिर्देशित केलेला एकही सदस्य नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यापीठ अनुदान आयोगाने सन २०१० व २०१८ मध्ये प्राध्यापक, कुलगुरू पदांच्या पात्रता, निवड समित्या, वेतनश्रेणी याबाबत नियमावली प्रसिध्द केलेली असून सन २०१८ च्या नियमावलीतील कलम ११ प्रमाणे कुलगुरू शोध समितीमध्ये किमान तीन ते पाच सदस्य आवश्यक असून यापैकी एक सदस्य विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेला असावा अशी तरतूद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिनांक २१ ऑक्टोबर, २०२२ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या एका निकालानुसार महाराष्ट्र शासनास विद्यापीठ अनुदान आयोगाने तयार केलेल्या नियमावलीत कोणताही बदल करता येत नसून विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमावलीचे उल्लंघन राज्य शासनास करता येत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे येथील कुलगुरू निवडीसाठी स्थापन झालेल्या शोध समितीमध्ये तीन सदस्य असले तरी त्यातील एकही सदस्य विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेला नसल्याने ही समिती अवैध ठरत असून यावर राज्य शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) नाही.
(२) खरे आहे.
(३) खरे आहे.
(४) मा.सर्वोच्च न्यायालयातील सिव्हील याचिका क्र. १५२५/२०१९ प्रकरणातील निर्देशानुसार कुलगुरु पदाच्या अर्हतेमध्ये बदल करणे व कुलगुरु पदाच्या शोध- नि-निवड समितीवर अध्यक्ष विद्यापीठ अनुदान आयोग यांनी नामनिर्देशित केलेल्या सदस्यांचा समोवश करणे आवश्यक झाल्याने तशी सुधारणा सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये करण्यात आली असून त्यानुसार कुलगुरु निवडीची प्रक्रिया लवकर पार पाडण्यात येणार आहे
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परिक्षेत आर्थिकदृष्टया मागास घटकातील विद्यार्थ्यांवर अन्याय झाल्याबाबत

**(१७) * १७५७८ श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात परीक्षा परिषदेच्यावतीने घेण्यात आलेल्या ५ वी ते ८ वी च्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परिक्षेत आर्थिकदृष्टया मागास घटकातील (ईडब्लुएस) विद्यार्थ्यांवर अन्याय झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे आर्थिकदृष्टया मागास घटकातून (ईडब्लुएस) संताप व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, चौकशीच्या अनुषंगाने माहिती घेवून या विद्यार्थ्यांना न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अन्न व औषधी प्रशासन विभागातील रिक्त पदांची भरती प्रक्रिया सुरु करण्याबाबत

**(१८) * १७८७६ श्री.महादेव जानकर, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अन्न व औषधी प्रशासन विभागातील पदभरती प्रक्रियेतील अनावश्यक अट रद्द करण्यासाठी माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये काढण्यात आलेल्या जाहिरातीला स्थगिती देण्यात आली असून सदरहू पदभरती प्रक्रिया गत १४ महिन्यांपासून प्रलंबित असल्याची बाब दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अन्न व औषधी प्रशासन विभागातील ५० टक्के पदे रिक्त असताना ‘औषध निरीक्षक’ या पदाची परीक्षा प्रलंबित असण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदर रिक्त पदांमुळे विभागामध्ये प्रतिनियुक्तीवर अधिकारी घेतले जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे चौकशीच्या अनुषंगाने अन्न व औषध विभागातील पदभरती प्रक्रियेतील अनावश्यक अट रद्द करून तात्काळ नव्याने जाहिरात प्रसिध्द करण्याबाबत तसेच विभागातील रिक्त पदांची भरती प्रक्रिया सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) अन्न व औषध प्रशासनातील औषध निरीक्षक संवर्गाच्या सध्याच्या सेवाप्रवेश नियमात असलेली अनुभवाची अट वगळून सुधारित सेवाप्रवेश नियम अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर सेवाप्रवेश नियम अंतिम स्वरुपात अधिसूचित झाल्यानंतर औषध निरीक्षक संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

औषध निरीक्षक संवर्गातील रिक्त पदांची संख्या व सदर पदे भरण्यास लागणारा कालावधी विचारात घेऊन, सदर संवर्गातील रिक्त पदे काही कालावधीसाठी शासकीय सेवेतील अधिकाऱ्यांमधून प्रतिनियुक्तीने भरण्याबाबतची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## विविध राज्यांमधील महाराष्ट्र परिचय केंद्र बंद पडण्याच्या अवस्थेत असल्याबाबत

**(१९) * १७८८२ श्री.शशिकांत शिंदे, श्री.अनिकेत तटकरे, श्री.सतिश चव्हाण, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठी भाषा व संस्कृतीचा प्रसार व्हावा, देशातून आणि परदेशातून येणाऱ्या पर्यटकांना महाराष्ट्राची संस्कृती, परंपरा यांचा परिचय व्हावा, मराठी भाषेबद्दल माहिती मिळावी यासाठी विविध राज्यांमध्ये शासनाने महाराष्ट्र परिचय केंद्रे सुरु केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदन व गोव्यातील पणजी अशा दोन ठिकाणी ही महाराष्ट्र परिचय केंद्रे असून सदर केंद्रामध्ये कर्मचाऱ्यांची भरतीच न केल्याने तेथे सांस्कृतिक कार्यक्रम होत नसल्याचे तसेच पणजी येथे असलेल्या केंद्रातील ‘क” गटातील एकमेव कर्मचाऱ्याचीसुध्दा सिंधुदूर्ग जिल्ह्याच्या माहिती कार्यालयात बदली करण्यात आल्याने सदरील केंद्र बंद पडण्याच्या स्थितीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बंद पडण्याच्या स्थितीत असलेली सदर दोन्ही महाराष्ट्र परिचय केंद्र पुन्हा सुरु करण्याबाबत तसेच सदर केंद्रांमध्ये कर्मचाऱ्यांची भरती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) महाराष्ट्र परिचय केंद्र सामान्य प्रशासन विभागाच्या माहिती व जनसंपर्क विभागाच्या अखत्यारित येतात. सदर विभागाच्या सहकार्याने मराठीचा प्रचार-प्रसार करण्यासाठी योजना/उपक्रम आखता येईल का या संदर्भात दिनांक १२/१२/२०२२ रोजी बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत झालेल्या निर्णयाप्रमाणे नवी दिल्ली व गोवा येथील महाराष्ट्र परिचय केंद्रामार्फत मराठी प्रचार-प्रसार कार्यक्रमासाठी प्रत्येकी रुपये १० लक्ष अनुदान देण्याबाबत योजना/उपक्रम सुरु करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

(२) दिनांक १२/१२/२०२२ च्या बैठकीत पदे रिक्त असणे जागा भाड्याची असणे असे मुद्दे माहिती व जनसंपर्क विभागाच्या निर्दशनास आणण्यात आले.

सदर बाब माहिती व जनसंपर्क विभागाच्या अखत्यारित असल्यामुळे, या मुद्याच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याबाबतचे निर्देश माहिती व जनसंपर्क विभागाला देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील अल्पसंख्याक दर्जा प्राप्त असलेल्या शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश प्रक्रियेतील गैरव्यवहाराची चौकशी करणेबाबत

**(२०) * १७९०५ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जयहिंद, एच.आर. व के.सी. या अल्पसंख्याक दर्जा प्राप्त असलेल्या शैक्षणिक संस्था तसेच तत्कालीन शिक्षण उपसंचालक आणि दलाल यांनी संगनमताने कोट्यावधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार करून अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांच्या ११ वी प्रवेशासाठी आरक्षित करण्यात आलेल्या जागांवर अन्य समाजातील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला असून त्याची चौकशी करण्याचे आश्वासन तत्कालीन शालेय शिक्षण मंत्री यांनी दिनांक २५ जून, २०१९ रोजी सभागृहात दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दिलेल्या आश्वासनानुसार अल्पसंख्याक महाविद्यालयातील ११ वी प्रवेशाच्या अल्पसंख्यांकांच्या राखीव जागेवर अन्य समाजातील विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन आर्थिक व्यवहार करुन प्रवेश देणाऱ्या संबंधित महाविद्यालयांवर व शिक्षण उपसंचालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय.
(२) व (३) कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर विहित कोटयांकरिता राखीव जागांवर करण्यात येत असलेल्या प्रवेशाबाबत तसेच एकूण प्रवेश प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने विभागीय शिक्षण उपसंचालक यांच्या अध्यक्षतेखाली विशेष भरारी पथक स्थापन करण्याबाबत आदेश देण्यात आले होते.

अल्पसंख्याक दर्जा प्राप्त शैक्षणिक संस्थांमध्ये अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांकरिता ५०% जागा राखीव ठेवण्यात येतात. सदर ५०% राखीव जागांवर प्रवेश देण्याचे अधिकार संस्था/संबंधित महाविद्यालयास आहेत. यानुसार प्रथमत: संबंधित अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश देण्यात येतात. अल्पसंख्यांक कोटयातील राखीव असलेल्या जागांमधून प्रवेश झाल्यानंतर शिल्लक राहिलेल्या जागा ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमध्ये स्वेच्छेने प्रत्यर्पित करण्याची तरतूद आहे. त्यानुसार कनिष्ठ महाविद्यालयांनी सदर कोटयाच्या जागा स्वेच्छेने प्रत्यार्पित केल्या होत्या. या प्रत्यार्पित केलेल्या जागेवर विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेमधून प्रवेश देण्यात आले आहेत.

-----------------

## पोलादपूर ते महाडदरम्यानच्या सावित्री नदीच्या नवीन पुलावरील लोखंडी चॅनेल तुटले असल्याबाबत

**(२१) * १७९५१ श्री.अनिकेत तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पोलादपूर ते महाडदरम्यानच्या सावित्री नदीच्या नवीन पुलावरील लोखंडी चॅनेल तुटले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अल्पावधीत बांधलेल्या या पुलाचे स्ट्रक्चरल ऑडीटशिवाय लोकार्पण करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सावित्री नदीच्या नवीन पुलावरील लोखंडी चॅनेल तुटल्याने संपूर्ण पुलाला हादरे आणि तीव्र स्वरुपाची कंपन जाणवू लागल्याने वाहनचालकांना या पुलाचा धोका वाटू लागला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सावित्री नदीच्या नवीन पुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट न करता लोकार्पण करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली तसेच सदर कामाचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन कामाच्या दर्जाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) अंशत: खरे आहे.

सावित्री पुलाचे जानेवारी, २०२३ च्या दरम्यान पुलाच्या स्लॅबला जोडणाऱ्या एका Expansion Joint चे काँक्रीट निघून गेल्याने सुमारे ३.५० मी. चा तुकडा निघाला होता.सदर Expansion Joint चे काँक्रीट तात्काळ करुन घेण्यात आले असून सदर पुलावरुन वाहतूक सुरळीतपणे सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

IRC मानांकनानुसार सावित्री पुलाच्या कामाची गुणवत्ता राखण्यात आली असून सदर पुलांचे लोकार्पण करणेपूर्वी में.ध्रुव कन्सल्टंसी मार्फत IRC मानांकनानुसार आवश्यक त्या सर्व चाचण्या घेऊन करण्यात आले होते.

(३) हे खरे नाही.

सदर पुल हा आर.सी.सी.गर्डर (RCC Girder) प्रकारचा असल्याने व सदर पुलासाठी निओप्रिन बेअरिंग वापरले असल्याने पुलावरुन वाहतूक सुरु असताना त्यांच्या हालचालीमुळे (movement) पुलाला कंपने जाणवतात व ते स्वाभाविकपणे होणे अपेक्षीत आहे. त्यामुळे पुलाला कोणताही धोका नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कर्की (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील कर्की ते बेलसवाडी रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(२२) * १८०२० श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कर्की (ता.मुक्ताईनगर, जि.जळगाव) येथील कर्की ते बेलसवाडी ह्या दोन कि.मी. रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्त्यास खड्डे पडलेले आहेत याबाबत तेथील ग्रामस्थांनी दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ठिकाणी पाचवी ते दहावीपर्यंत माध्यमिक विद्यालय असून परिसरातील बेलसवडी, पिंपरीपंचम, लोहारखेडा, धाबे येथून शेकडो विद्यार्थी कर्की येथे शिक्षणासाठी सायकलीने येत असून रस्त्यावर साईडपट्ट्या नसल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवास करताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा परिसर केळी उत्पादनासाठी प्रसिध्द असून केळी उत्पादकांना आपला माल बाजारपेठेत नेण्यासाठी वाहनांचा वापर करावा लागतो मात्र खराब रस्त्यामुळे वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असून खड्डे चुकविताना अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने या प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची करणे काय आहेत?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) ग्रामस्थांचे निवेदन सार्वजनिक बांधकाम विभागास प्राप्त नाही.
(२) सदर रस्त्याची सर्वसाधारण रूंदी ५.५० मी.आहे. सदर रस्त्याची तात्पुरती दुरूस्ती करण्यात आली आहे.
(३) हे खरे नाही.

सदर रस्त्यावर सन २०२२ मध्ये अपघाताची नोंद नाही.

(४) कर्की ते बेलसवाडी हा रस्ता ग्रामीण मार्ग दर्जाचा आहे. सदर रस्त्याची एकूण लांबी २.०० कि.मी. असून सदर रस्ता देखभाल दुरूस्तीसाठी संबंधित जिल्हा परिषद यांचे अखत्यारित आहे. सदर रस्त्यावरील २ कि.मी. लांबीत मजबूतीकरण व डांबरीकरणाचे मंजूर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करून काम कार्यान्वित करणेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील पहिली ते बारावीच्या विद्यार्थांच्या आधार कार्डची माहिती सरल प्रणालीवर भरणेबाबत

**(२३) * १८२५१ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शाळांतील संच मान्यतेसाठी पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांच्या आधार कार्डची माहिती सरल प्रणालीवर भरणे शाळांना बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळेतील २० टक्क्यांहून अधिक विद्यार्थ्यांच्या आधार कार्डची माहिती या प्रणालीवर नोंदविण्यात आलेली नसल्याचे माहे डिसेंबर, २०२२ अखेर शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे ही खरेआहे काय,
(३) असल्यास, विद्यार्थ्यांच्या आधार कार्डची माहिती सरल प्रणालीवर न नोंदविण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या आधार कार्डची माहिती सरल प्रणालीवर नोंदविण्याबाबत शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

मुंबई महापालिकेच्या शाळांतील माहे डिसेंबर, २०२२ अखेर विद्यार्थ्याच्या आधार कार्डची नोंदणी सरल प्रणालीवर ९४.१२ टक्के इतके काम पूर्ण झालेले होते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) जास्तीत जास्त विद्यार्थ्यांची आधार नोंदणी व अद्ययावतीकरण करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शिर्डी एअरपोर्ट ते ओझर एअरपोर्ट (जि.नाशिक) येथील रस्त्याच्या कामाची दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नाशिकमार्फत चौकशी करण्याबाबत

**(२४) * १८३०१ प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिर्डी एअरपोर्ट ते ओझर एअरपोर्ट (जि.नाशिक) येथील रस्त्यामध्ये ४६/६०० ते ६०/५०० कि.मी.ची सुधारणा करणे, रामा-३५, (ता.कोपरगाव) (५३/०० ते ६८/८००) या कामास केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत रुपये १० कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मंजुरी प्राप्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामाची तपासणी केली असता दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नाशिक यांना अनेक त्रुटी आढळून आल्या असल्याने शासनाचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नाशिक यांच्यामार्फत जबाबदारी निश्चित करण्यात आली असून रुपये १६,९९,१५२/- इतकी रक्कम संबंधीतांकडून वसुल करावी असा अंतिम निर्णय झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याचे सदोष काम करणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी व कंत्राटदाराविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद करून कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे खरे आहे.

(२) होय, अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नाशिक यांचा अहवाल प्राप्त आहे.

(३) व (४) अधीक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, नाशिक यांचे प्राप्त अहवालानुसार पुढील उचित कार्यवाही करणेत येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सायबर विद्यापीठ स्थापन करण्याबाबत

**(२५) * १७७११ श्री.अंबादास दानवे : तारांकित प्रश्न क्रमांक १४६६२ ला दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाने "स्कुल ऑफ सायबर सिक्युरिटी" सुरु करण्याचा प्रस्ताव शासनाला देऊनही तत्संदर्भात कोणतीही कार्यवाही शासनाकडून करण्यात आली नसल्याची बाब दिनांक ५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय यांचे अध्यक्षतेखाली स्थापना करण्यात आलेल्या कार्यगटाचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात वाढलेल्या सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी तसेच त्याबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी महत्वाच्या असलेल्या सायबर विद्यापीठाची स्थापना करण्याबाबतच्या सदर प्रस्तावावर शासनाकडून कोणता निर्णय घेण्यात आला, त्यामध्ये कोणत्या सुधारणा करण्यात आल्या, सदर प्रस्तावाला मान्यता देण्याबाबत शासन कधीपर्यंत निर्णय घेणार आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने राज्यात पहिले सायबर विद्यापीठ स्थापन करण्याबाबतच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या प्रस्तावाला मान्यता देऊन विद्यापीठ सुरु करण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे खरे नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ३०/१२/२०१९ च्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार विद्यापीठाने "स्कुल ऑफ सायबर सिक्युरिटी" सुरू करण्याचा प्रस्ताव सविस्तर प्रकल्प अहवालासह शासनास दिनांक १०/०२/२०२१ रोजी सादर केला असून, याअनुषंगाने सर्व बाबींचा तपशीलवार अभ्यास करण्यासाठी संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगटाची स्थापना शासनाच्या दिनांक २६/०२/२०२१ च्या परिपत्रकान्वये करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.

सदरच्या कार्यगटाचा अहवाल संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई यांनी त्यांच्या दिनांक २६/०८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केला होता.तथापि, त्रुटी पुर्तता करण्यासाठी प्रस्ताव शासनास फेरसादर करण्याबाबत संचालकांना दिनांक १३/०९/२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.
(३) व (४) याअनुषंगाने संचालक, तंत्र शिक्षण यांचेकडून त्रुटीची पुर्तता करून सुधारित प्रस्ताव दिनांक २२/०२/२०२३ रोजी प्राप्त झाला असून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## केंद्र शासनाने निर्धारित केलेला प्रति विद्यार्थी निधी सर्व शाळांना मिळण्यासह अन्य मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(२६) * १७५६० ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने निर्धारित केलेला प्रति विद्यार्थी ३१,५२१ रुपये निधी सर्व शाळांना मिळावा व अन्य मागण्यासाठी आरटीई फाउंडेशनतर्फे नागपूर हिवाळी अधिवेशनावर भव्य मोर्चा काढण्यात आला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मोर्चात विविध शाळांचे संस्थापक व शिक्षक यांनी सहभाग घेऊन आपल्या विविध मागण्यांचे निवेदन माननीय शालेय शिक्षण मंत्री महोदयांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना /कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) आरटीई फाउंडेशनतर्फे नागपूर हिवाळी अधिवेशनावर मोर्चा काढण्यात आला होता.
(२) निवेदन प्राप्त आहे.
(३) व (४) सदर निवेदनातील विषयाप्रकरणी चौकशी करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील त्रुटीपूर्तता केलेल्या शाळांना निधी उपलब्ध करून देणेबाबत

**(२७) * १७२४७ श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक १६१३२ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विनाअनुदानित शाळांना अनुदान देण्यासाठी ११०० कोटी रुपये देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने दिनांक १३ डिसेंबर, २०२२ रोजी घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निर्णयामुळे ६०१० प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना तसेच १४,८६२ तुकड्यांना आणि ६३,३३८ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना अनुदान मिळणार असून त्रुटीपूर्तता शाळांसाठी पूर्वलक्षी प्रभावाने रुपये ९४ कोटींची तरतूद केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सर्व शाळा शिक्षकांना १०० टक्के पगार देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने त्रुटीपूर्तता केलेल्या शाळांसाठी निधीची तरतूद करण्याबाबत तसेच सर्व शाळा शिक्षकांना १०० टक्के पगार देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय.
(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक १३/१२/२०२२ रोजीच्या बैठकीत त्रुटी पुर्तता केलेल्या पात्र शाळांना २० टक्के व ४० टक्के तसेच, पात्र अघोषित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळा वर्ग/तुकड्यांना सरसकट २० टक्के अनुदान देण्याचा तसेच, यापूर्वी २० टक्के व ४० टक्के अनुदान घेत असलेल्या शाळांना पुढील २० टक्के अनुदानाचा वाढीव टप्पा अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतचा शासन निर्णय, दिनांक ६/२/२०२३ रोजी निर्गमित केला आहे.त्यानुसार, अनुदान पात्र शाळांतील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक १/१/२०२३ पासून अनुदान अनुज्ञेय केले आहे. याकरिता चालू आर्थिक वर्षासाठी रुपये २७५ कोटी इतका निधी पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध झाला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे बेलापूर मार्गाच्या पूर्वेकडील एमआयडीसीकरिता जमिनी संपादित केलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांना किंवा वारसांना नोकरीमध्ये डावलल्याबाबत

**(२८) * १७४२५ श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर : तारांकित प्रश्न क्रमांक १२११५ ला दिनांक ३ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारने एमआयडीसीसाठी ठाणे, बेलापूर पट्ट्यामध्ये कारखानदारी उभारण्यासाठी सुमारे २ हजार ३३३ हेक्टर संपादित केलेल्या जमिनीपैकी ५०% एवढ्या क्षेत्रावर कारखानदारी उभारली असून त्यापैकी ४०० एकर क्षेत्रावर झोपडपट्टी वसली असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई औद्योगीकरण आणि आधुनिक शहरीकरणासाठी ठाणे-बेलापूर मार्गाच्या पूर्वेकडील हजारो हेक्टर शेत जमिनी एमआयडीसीने विकत घेतल्या असून या बदल्यात प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना किंवा त्यांच्या वारसांना नोकऱ्या देण्याचे आश्वासन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाकडून यशस्वी क्षेत्रात दिनांक १७ डिसेंबर,२०२२ रोजी राबविण्यात आलेल्या भरती प्रक्रीयेमध्ये एमआयडीसीच्या महापे येथील संबंधित अधिकाऱ्याने स्थानिक प्रकल्पग्रस्तांना जाणीवपूर्वक डावलल्याचा प्रकार निदर्शनास आला असून, एमआयडीसी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या समस्या व अडचणी सोडविण्यासाठी महाराष्ट्र राज्य एमआयडीसी प्रकल्पग्रस्त शेतकरी कृती समितीने मा.मुख्यमंत्री महोदयांना दिनांक २२ सप्टेंबर, २०२२ रोजी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर निवेदनात एमआयडीसी क्षेत्रातील मूळ गावठाणातील गावठाण विस्ताराची योजना राबविण्यात यावी, प्रकल्पग्रस्तांना पी.ए.पी.योजनेंतर्गत शंभर चौरस मीटर भूखंड देण्यात येणाऱ्या भूखंडाला पूर्वीचे दर लागू करण्यात यावेत, सन १९६३ मध्ये म्हणजे सुमारे ६० वर्षांपूर्वी संपादित केलेल्या संपादनाच्या मूळ उद्दिष्टांसाठी किंवा इतर कोणत्याही कारणासाठी वापरात न आलेली जमीन प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना परत करण्यात यावी, प्रकल्पग्रस्तांच्या वारसांना रोजगाराची संधी उपलब्ध करून द्यावी, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या शैक्षणिक संस्थांना शासनाने ठरविलेल्या दरात इमारतीसाठी व मैदानासाठी भूखंड देण्यात यावेत, टी टी औद्योगिक क्षेत्र महापे येथे महामंडळाच्या नियमानुसार हेलिपॅड तयार करण्यात यावे, यासह एकूण बारा मागण्यांचे निवेदन शासनाला दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य एमआयडीसी प्रकल्पग्रस्त शेतकरी कृती समितीने दिलेल्या निवेदनावर तसेच एमआयडीसीकडून राज्य शासनाच्या रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्यांमध्ये डावलल्याबाबत एमआयडीसीतील संबंधित अधिकाऱ्यांची खाते निहाय चौकशी करुन संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१) अंशत: खरे आहे.

टिटिसी औद्योगिक क्षेत्राकरीता एकूण २४६९.०४ हे.आर क्षेत्र अधिसूचित करण्यात आले असून त्यापैकी २३३३.२७ हे.आर क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या ताब्यात आले आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या धोरणानुसार टीटीसी औद्योगिक क्षेत्रातील आरेखीत भूखंडाचे विविध

औद्योगिक, व्यापारी, प्रकल्पग्रस्त, दिव्यांग, सुविधा क्षेत्राकरिता वाटप करण्यात आले आहेत. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या ताब्यात असलेल्या क्षेत्रापैकी एकूण १५२.६० हे.आर क्षेत्रावर झोपडपट्टी वसली आहे.

(२) अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने टिटिसी औद्योगिक क्षेत्राकरीता जमिनी संपादित केल्या आहेत. तथापि, प्रकल्पग्रस्तांच्या वारसांना नोकरी देण्याबाबत आश्वासन दिलेले नाही.

(३) व (४) हे खरे नाही.

(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या विविध मागण्यांबाबत

**(२९) * १७८२३ श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केंद्र व राज्य शासनाने आर्थिक कारणामुळे तासिका तत्वावर (सीएचबी) धोरण सुरू केले, त्यातून उच्च शिक्षित मनुष्यबळ अतिशय कमी पैशात मिळत असल्याची बाब माहे मार्च, २०२१ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेली १० वर्षे भरती प्रक्रियाच थांबविली असल्याने राज्यात लाखो सहाय्यक सहयोगी प्राध्यापक यांची पदे रिक्त आहेत तसेच सीएचबी प्राध्यापक तुटपुंज्या पगारावर उदरनिर्वाह करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रत्येक वर्षी सेट-नेट उत्तीर्ण होणाऱ्यांमध्ये मोठी भर पडत असल्यामुळे उच्च विद्याविभूषितांना वेटर, मॅनेजर, रस्त्यावर पुस्तके विकणे, गॅस वितरण करणे अशी कामे करावी लागत आहेत तसेच दहा वर्षांत नेट परीक्षा व पीएचडीधारक विद्यार्थ्यांची संख्या कोटीच्या पुढे गेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाविद्यालय व विद्यापीठात १०० टक्के प्राध्यापक भरती करावी, तासिका (सीएचबी) धोरण पूर्णत: बंद करावे, कायमस्वरूपी सेवेत समाविष्ट झाल्यानंतर सीएचबी अनुभव ग्राह्य धरण्यात यावा, जादा कार्यभारासाठी अर्धवेळ कायमस्वरूपी प्राध्यापक पदाची निर्मिती करावी, विनाअनुदानित महाविद्यालयांना १०० टक्के अनुदान द्यावे आदी प्रमुख मागण्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना/ कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) हे खरे नाही. भरती प्रक्रिया बंद नसून सुरु आहे.

(४) अशा स्वरुपाची मागणी करण्यात येत आहे, हे खरे आहे.

(५) अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकीय पदे भरण्यास शासन निर्णय दिनांक ०३/११/२०१८ व दिनांक १२/११/२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय दिनांक ०७/०८/२०१९ व दिनांक १६/११/२०२२ अन्वये अकृषी विद्यापीठातील शिक्षकीय पदे भरण्यास

मंजूरी देण्यात आली आहे. तासिका तत्वावरील नियुक्तीच्या धोरणाचा आढावा घेऊन नवीन पर्यायी धोरणाबाबत शासनास शिफारशी करण्यासाठी संचालक, उच्च शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीच्या शिफारशी व शासनाचे प्रचलित धोरण विचारात घेऊन शासन निर्णय दिनांक १७/१०/२०२२ अन्वये तासिका तत्वावरील अध्यापकांच्या नियुक्तीची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळांतर्गत कोरानासह इतर आजारांवर लसनिर्मिती करण्यासाठी अद्ययावत प्रयोगशाळांची निर्मिती करण्याबाबत

**(३०) * १७८६७ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना काळात बायोटेक आणि सीरम इन्स्टिट्यूटकडे अनुक्रमे कोव्हॅक्सिन आणि कोविशील्ड या लसींचा तुटवडा असल्यामुळे तत्कालीन शासनाने हाफकिन महामंडळाच्यामार्फत भारत बायोटेक कंपनी सोबत सामंजस्य करार करून लसनिर्मितीचा निर्णय घेतला असून प्रयोगशाळा उभारणीसाठी केंद्र शासन व आरसीएमआरकडूनही मान्यता मिळूनही सदर प्रयोगशाळेची अद्यापपर्यंत निर्मिती करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन शासनाने हाफकिन महामंडळाच्यामार्फत एका वर्षात कोरोना लसनिर्मिती करण्यात येणार असल्याचे जाहीर करूनही आजमितीस प्रत्यक्ष कोरोना लसनिर्मितीच्या कामास सुरूवात न होण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत

(३) असल्यास, जैवसुरक्षा श्रेणी ३ (बीएसएल ३) या प्रयोगशाळेत कोरोना व्यतिरिक्त अन्य लसीही तयार करता येणार असल्यामुळे ही प्रयोगशाळा राज्यसाठीच नव्हेतर देशासाठी अत्यंत महत्वाची असल्याने सदरहू प्रयोगशाळेचे प्रलंबित काम विनाविलंब हाती घेऊन सदर प्रयोगशाळा लसनिर्मितीसाठी लवकरात लवकर सक्षमरित्या कार्यान्वित होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळ (मर्या.), मुंबई येथे केंद्र आणि राज्य शासनाच्या सहकार्याने कोर्वॅक्सिन लस उत्पादित करण्याच्या प्रकल्पास केंद्र आणि राज्य शासनाची मान्यता मिळाल्यानंतर कोर्वॅक्सिन लस उत्पादन करण्याच्या अनुषंगाने मेसर्स भारत बायोटेक यांचेकडील कोर्वॅक्सिन लस उत्पादन तंत्रज्ञान महामंडळास हस्तांतरण करण्यासाठी प्राथमिक टप्यात गोपनीयता व सामंजस्य करार करण्यात आला. तद्नंतर पुढील टप्प्यावर तंत्रज्ञान हस्तांतरणासाठी Term Sheet ला शासनाची मान्यता व स्वाक्षरी होऊन ते पुढील कार्यवाहीसाठी मेसर्स भारत बायोटेक यांचेकडे हाफकिन महामंडळाकडून दिनांक २०/०९/२०२२ रोजी पाठविण्यात आले आहे. तसेच, हाफकिन महामंडळाने केंद्र शासनाच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या जैव तंत्रज्ञान विभागाच्या अखत्यारितील जैव तंत्रज्ञान उद्योग सहाय्यता परिषद

(BIRAC) संस्थेकडून प्रकल्पासाठीचा मंजूर निधी प्राप्त करण्यासाठी अनुदान पत्र करारनामा (Grant-in-Aid Letter Agreement) पुढील कार्यवाहीसाठी BIRAC यांचेकडे दिनांक २८/०९/२०२२ रोजी पाठविला आहे. तथापि, मेसर्स भारत बायोटेक आणि केंद्र शासनाच्या BIRAC या संस्थेकडून याबाबत कोणताही प्रतिसाद हाफकिन महामंडळास मिळालेला नाही. मेसर्स भारत बायोटेक यांचेकडून तंत्रज्ञान हस्तांतरणबाबत होत असलेला विलंब तसेच प्रस्तुत प्रकल्पाकरिता केंद्र शासनाचा निधी अप्राप्त असल्याने व इतर अनुषंगिक बाबी इत्यादीमुळे अद्यापपर्यंत प्रयोगशाळेची निर्मिती करण्यात आलेली नाही व प्रत्यक्ष कोरोना लस निर्मितीच्या कामास सुरुवात होऊ शकलेली नाही.

(३) व (४) कोवॅक्सिन लस उत्पादन प्रकल्पाचा आढावा घेण्यासाठी आणि त्याच्या भविष्यातील व्याप्तीवर चर्चा करण्यासाठी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या उच्चस्तरीय आढावा समितीची बैठक दिनांक ०९/०१/२०२३ रोजी संपन्न झाली आहे. केंद्र शासनाची BIRAC ही संस्था या प्रकल्पातील प्रमुख भागधारक असल्याने सदर प्रकल्पाच्या भविष्यातील व्याप्तीबद्दल सदर संस्थेचा सल्ला/मार्गदर्शन प्राप्त करुन घ्यावा व तद्नंतर पुढील आवश्यक ती कार्यवाही करावी असा निर्णय उक्त बैठकीमध्ये घेण्यात आला आहे. सदर निर्णयाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## राज्याबाहेर गेलेल्या मोठ्या उद्योगधंद्यांबाबतची श्वेतपत्रिका काढून निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्याबाबत

**(३१) * १८२९० श्री.अमोल मिटकरी, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक १५१३० ला दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तत्कालीन व विद्यमान सरकारच्या काळात मागील अडीच वर्षात उभारण्यात येणारे मोठे उद्योग राज्याबाहेर गेले यासंबंधीची श्वेतपत्रिका (white paper) १ महिन्यात प्रसिध्द करण्यात येईल असे मा.उद्योग मंत्री महोदयांनी दिनांक १ नोव्हेंबर, २०२२ रोजी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत माध्यमांसमोर सांगितले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्याबाहेर गेलेल्या सदर प्रकल्पांची चौकशी करण्यासाठी माजी न्यायमुर्तींच्या अध्यक्षतेखाली दोन निवृत्त सनदी अधिकाऱ्यांचा समावेश असणारी समिती गठीत करुन समिती दोन महिन्यात अहवाल शासनास सादर करणार असल्याचेही मा.उद्योग मंत्री महोदयांनी दिनांक २० नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या पत्रकार परिषदेत माध्यमांसमोर सांगितले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.उद्योग मंत्री महोदयांनी पत्रकार परिषदेत जाहीर केलेली श्वेतपत्रिका माहे जानेवारी, २०२३ अखेरपर्यंत प्रसिध्द झाली नाही तसेच माजी न्यायमुर्तींच्या अध्यक्षतेखाली दोन निवृत्त सनदी अधिकाऱ्यांचा समावेश असणाऱ्या समितीची स्थापना अद्याप करण्यात आली नसल्याचे दिनांक २९ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर श्वेतपत्रिका प्रसिध्द करणे व मा.निवृत्त न्यायमुर्तींच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.उदय सामंत :** (१), (२) व (३) मा.मंत्री (उद्योग) यांनी वेदांता, टाटा एअरबस सी २९५, सॅफ्रन व इतर मोठ्या प्रकल्पांबाबतचा वस्तुस्थिती अहवाल येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सादर करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

(४) वेदांता उद्योग समुहास दिनांक १४ व १५ जुलै, २०२२ रोजी मा.मुख्यमंत्री तसेच मा.उप मुख्यमंत्री महोदयांच्या पत्राव्दारे राज्य शासनासोबत सामंजस्य करार करण्याबाबत कळविण्यात आले. दिनांक १५ जुलै, २०२२ रोजी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीची (High Powered Committee) बैठक घेण्यात येऊन, सदर बैठकीत सुमारे ३८,०००/- कोटी इतक्या मूल्याची भांडवली प्रोत्साहने, जमीन, वीज, पाणी इ. सवलती व इतर प्रोत्साहने वेदांताच्या नियोजित प्रकल्पास देवू करण्यात आली. तथापि, या घटकाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अथवा राज्य शासनाशी कोणताही सामंजस्य करार केला नाही.

एअरबस-टाटा या बहुराष्ट्रीय कंपनीने त्यांच्या नियोजित प्रकल्पाबाबत गुंतवणूकीकरीता राज्य शासन अथवा एमआयडीसीसोबत सामंजस्य करार (MOU) केलेला नव्हता, अथवा जागेची मागणी करणारा कोणताही अर्ज महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे दाखल केला नाही. तसेच भारतीय हवाई दलासाठी सी - २९५ जातीची मालवाहू विमाने उत्पादित करणारा २२ हजार कोटींचा एअरबस - टाटा प्रकल्प गुजरात मधील बडोदा येथे उभारण्यात येईल अशी घोषणा केंद्रीय संरक्षण सचिव श्री.अजय कुमार यांनी दिनांक २७ ऑक्टोबर, २०२२ रोजी दिल्ली येथे केली. त्यामुळे हा प्रकल्प महाराष्ट्रातून इतर ठिकाणी गेला असे म्हणणे संयुक्तिक नाही.

सॅफ्रन या फ्रेंच बहुराष्ट्रीय कंपनीने त्याच्या नियोजित प्रकल्पाबाबत गुतंवणुकीसाठी अथवा जागेची मागणी करणारा कोणताही अर्ज महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे दाखल केलेला नाही, तसेच सदर कंपनीने सॅफ्रान प्रकल्पाबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाशी कोणतेही चर्चा अथवा पत्रव्यवहार केलेला नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील इंग्रजी माध्यमाच्या शाळांना शासनाकडून आरटीई प्रतिपूर्ती शुल्क मिळणेबाबत

**(३२) * १८०४४ श्री.रामदास आंबटकर : तारांकित प्रश्न क्रमांक १३८७४ ला दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील जवळपास १६५ इंग्रजी माध्यमांच्या शाळांना सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२ या वर्षातील आरटीई प्रतिपूर्ती शुल्क शासनाकडून मिळाले नसल्याचे दिनांक २८ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या धोरणानुसार बालकांना मोफत शिक्षण अंतर्गत इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंत शिक्षण देणाऱ्या जिल्ह्यातील १६५ शाळांचे आरटीई प्रतिपूर्ती शुल्क देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

निधि उपलब्धेनुसार शैक्षणिक शुल्काची प्रतिपुर्ती संबंधित शाळांना केली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शासनाच्या शिक्षण शुल्क सुधारणा समितीच्या अहवालाची अंमलबजावणी करण्याबाबत

**(३३) * १६९५४ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक १४६६४ ला दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ आणि २०१६ मध्ये सुधारणा सुचविणे किंवा नवीन अधिनियम प्रस्तावित करणे, अन्य राज्यातील शुल्क अधिनियमांचा अभ्यास करून राज्यासाठी सुसंगत धोरण सुचविणे, कायदे आणि नियमांचा अभ्यास करून उपाययोजना अहवाल सादर करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाचे सहसचिवांच्या अध्यक्षतेखाली सन २०२१ मध्ये समिती नियुक्त करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय विद्यार्थ्यांचे पालक, शैक्षणिक संस्था, पालक संघटना आणि सर्वसामान्य जनतेकडून सदरहू अधिनियमात सुधारणा सुचविण्यासाठी तब्बल २,८२५ सूचना ऑनलाईन पध्दतीने प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू समितीने याबाबतचा अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(४) असल्यास, सदरहू समितीने अहवालात केलेल्या शिफारसींचे थोडक्यात स्वरूप काय आहे आणि त्यापैकी कोणत्या शिफारसी शासनाने स्वीकारल्या आहेत,

(५) असल्यास, शालेय शुल्काबाबत खाजगी शाळांतील विद्यार्थ्यांच्या पालकांना दिलासा देण्यासाठी सदरहू शिक्षण शुल्क नियमन सुधारणा अहवालाची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) व (५) समितीच्या शिफारशी शासनाच्या विचाराधीन आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील माणगांव बायपासचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३४) * १७९५३ श्री.अनिकेत तटकरे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई गोवा महामार्गाच्या कामामध्ये माणगांव (जि.रायगड) शहराला बाह्यवळण रस्ता (बायपास) देण्यात आला असून बाह्यवळण रस्त्याचे काम प्रलंबित असल्यामुळे माणगांव शहरात वाहतूक कोंडी होत असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने बाह्यवळण रस्त्याचे काम जलद गतीने पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कर्यवाही / उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रविंद्र चव्हाण :** (१) हे अंशत: खरे आहे.

वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी माणगांव शहरासाठी बाहयवळण मार्ग प्रस्तावित आहे. या मार्गातील काही लांबी वन जमिनीतुन जात असल्यामुळे वन विभागाची परवानगी मिळण्यास झालेला विलंब व भूसंपादन वाटपामधील अडथळयांमुळे सदर लांबीतील काम हे प्रलंबित होते.
(२) वनजमिनीमध्ये काम करण्यासाठी वनविभागामार्फत Stage-I व Stage-II ची मंजूरी प्राप्त झाली असून, काम करण्यासाठीची परवानगी दिनांक १४/११/२०२२ रोजी मिळाल्याने वनजमिनीतील रखडलेले काम सुरु झाले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू करुन फरकाची रक्कम देण्याबाबत

**(३५) * १८२१२ श्री.एकनाथराव खडसे : तारांकित प्रश्न क्रमांक ११८०६ ला दिनांक १५ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापिठ व संलग्नित महाविद्यालयातील १४१० शिक्षकेतर कर्मचारी यांना ७ व्या वेतन आयोगाचे लाभापासून वंचित ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाकडून ७ वा वेतन आयोग लागू करून फरकाची रक्कम अदा करणेबाबत विचाराधीन आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अकृषी विद्यापिठ व संलग्नित महाविद्यालयातील कर्मचारी यांना ७ वा वेतन आयोग लागू करुन फरकाची रक्कम देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१), (२) व (३) शासन अधिसूचना दिनांक ०७/०९/२०१९ अन्वये महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला असून थकबाकी अनुज्ञेय करण्यात आली आहे. तसेच शासन अधिसूचना दिनांक ०८/१२/२०२० अन्वये अकृषी विद्यापीठातील शिक्षकेतर अधिकारी/कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात आला आहे.

सातवा वेतन आयोग लागू करण्याचे राहून गेलेल्या पदांना सातवा वेतन आयोग लागू करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. अकृषी विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाची थकबाकी अदा करण्यासंदर्भात मा.उपमुख्यमंत्री महोदयांनी दिनांक १५/०२/२०२३ च्या बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आय.सी.एस.ई. बोर्डाच्या शाळेत पहिली ते दहावी पर्यंत मराठी विषय सक्तीचा करण्याबाबत

**(३६) * १८०७९ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात विशेषत: मुंबईत असलेल्या आय.सी.एस.ई. बोर्डाच्या शाळांच्या मुख्याध्यापकांकडून इयत्ता ९ व १० वी साठी मराठी विषय अध्यापन व अध्ययनाकरिता घेण्यात येऊ नये यासाठी आय.सी.एस.ई. कौन्सिल बोर्डाकडे ई-मेलद्वारे दिनांक ६ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास मागणी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील आय.सी.एस.ई बोर्डाच्या शाळांमध्ये स्थानिक मराठी भाषिक शिक्षकांची भरती कमी करण्यात येत असून अनेक शिक्षकांना त्यांच्या पुढील पदोन्नतीपासून वंचित ठेवण्यात येत असून शाळांमध्ये मराठी विषयासाठी अन्य भाषिक शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात मराठी भाषेसाठी व मराठी विषय शिक्षणपध्दतीमध्ये समाविष्ट करण्यासाठी कायदा तयार करण्यात आला असतानाही आय.सी.एस.ई. बोर्डाच्या शाळांमध्ये मराठी विषयाबाबत करण्यात येणाऱ्या शिक्षकांच्या नियुक्तीबाबतचा चुकीचा अहवाल मुंबईतील शिक्षण निरीक्षक कार्यालयातुन शासनास सादर करण्यात येतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबईतील शिक्षण निरीक्षक कार्यालयातून शासनास चुकीचा अहवाल सादर करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन राज्यात आय.सी.एस.ई. बोर्डाच्या शाळांमध्ये इयत्ता १ ली ते १० वी पर्यंत मराठी विषय सक्तीचा करण्याबाबत तसेच शाळांमध्ये मराठी विषयासाठी मराठी शिक्षकांची नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) सर्व परीक्षा मंडळांच्या शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. मुंबई परिसरात एकूण ११९ आय.सी.एस.ई. बोर्डाच्या शाळा असून सर्व शाळांमध्ये मराठी भाषा शिकविण्यात येत आहे. आय.सी.एस.ई. बोर्डाच्या शाळांमध्ये स्थानिक मराठी भाषिक शिक्षकांची भर्ती कमी करण्यात येत असून अनेक शिक्षकांना त्यांच्या पुढील पदोन्नतीपासून वंचित ठेवून शाळांमध्ये मराठी विषयासाठी अन्य भाषिक शिक्षकांची नियुक्ती करण्यात येत असल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उच्च माध्यमिक शाळेतील वाढीव पदांना अनुदान देण्याबाबत

**(३७) * १७२३६ श्री.कपिल पाटील, श्री.किशोर दराडे, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक १५५२७ ला दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उच्च माध्यमिक शाळेतील व्यपगत पदे व सन २०१९ पर्यंतच्या वाढीव पदांना अनुदान देणेसाठी उच्चस्तरीय सचिवांच्या समितीऐवजी मंत्रिमंडळापुढे प्रस्ताव सादर करून अनुदान देणेबाबत मा.शिक्षण मंत्री यांनी निर्देश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी मान्यता प्राप्त कनिष्ठ महाविद्यालयांच्या वाढीव पदांना सन २००३ मध्ये नियुक्ती दिनांकापासून १०० टक्के अनुदान देऊन वेतन सुरु करणेबाबतची मागणी शिक्षक संघटनांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वाढीव पदांच्या नस्तीमध्ये विधी व न्याय विभागाने त्रुटी काढली असल्याने या त्रुटी पूर्ण करण्यासाठी संचालक शिक्षण यांचेकडे ६ महिन्यांपासून नस्ती प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शाळेतील वाढीव पदांना १०० टक्के अनुदान देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर :** (१) हे अंशत खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) राज्यातील मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळांमधील व्यपगत करण्यात आलेल्या पदांपैकी २१४ पदे पुनरुज्जिवीत करण्याबाबतचा प्रस्ताव उच्चस्तरीय समितीसमोर मान्यतेसाठी सादर करण्यात आलेला आहे. उर्वरित वाढीव पदांना मान्यता देण्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयांचे नामफलक मराठीत करण्याबाबत

**(३८) * १७८९७ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठीचा प्रसार आणि प्रचार होण्यासाठी आणि मराठी भाषा टिकविण्यासाठी दुकानांचे नामफलक मराठीत करण्यात येत असल्याच्या धर्तीवर मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयांचे नामफलकदेखील मराठीत करण्यात यावेत, अशी मागणी तत्कालीन सिनेट सदस्यांनी माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान पार पडलेल्या अर्थसंकल्पीय अधिसभेत केली असल्याची बाब दिनांक १२ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयांचे नामफलक मराठीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

(२) राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे शासकीय, अशासकीय, अनुदानित विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित, पदव्यूत्तर पदवी, महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थांचे संचालक यांना मराठी भाषेतून नामफलक लावण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक १५/०२/२०२० अन्वये, तसेच मुंबई विद्यापीठ, मुंबई यांनी त्यांचे परिपत्रक दिनांक २४ फेब्रुवारी, २०२० व दिनांक ३१/०३/२०२२ अन्वये त्यांचेशी संलग्न अकृषी महाविद्यालये यांना सूचना दिल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.